05 JUN 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अजितसिंह जाधव विद्यापीठाचे नवे परीक्षा संचालक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी येथील प्रा. डॉ. अजितसिंह नारायणराव जाधव यांची निवड झाली आहे. शुक्रवारी मुलाखती झाल्यानंतर शनिवारी लगेच विद्यापीठ प्रशासनाकडून ही निवडीची घोषणा झाली. कोल्हापुरातील डॉ. डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी अभिमत विद्यापीठात ते परीक्षा नियंत्रक होते. या निवडीमुळे तब्बल तीन वर्षानंतर परीक्षा संचालकपदाचे प्रभारीराज संपुष्टात आले.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थीच परीक्षा संचालक बनल्याचा योगही यानिमित्ताने जुळून आला. डॉ. जाधव हे मूळचे मेडशिंगी (ता. सांगोला, जि. सोलापूर) चे आहेत. शनिवारी कुलसचिवपदासाठी मुलाखती झाल्या. २७ पात्र उमेदवारांपैकी १७ जणांनी मुलाखत दिली. आज रविवारी नूतन कुलसचिवपदाची घोषणा होण्याची शक्यता आहे. महेश काकडे यांची पुणे विद्यापीठात परीक्षा संचालक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर गेल्या तीन वर्षांपासून रिक्त होते. या पदाची प्रभारी जबाबदारी जी. आर. पळसे यांच्याकडे होती.

डॉ. डी.वाय. पाटील शिक्षण समूहात १९९३ पासून अधिव्याख्याता पदापासून कारकिर्दीस सुरुवात करत डॉ. जाधव यांनी सहायक प्राध्यापक, अधिविभाग प्रमुख, डी.वाय. अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूरचे उप-प्राचार्य व प्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, अधिष्ठाता (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष), अधिष्ठाता (अभियांत्रिकी विद्याशाखा), आदी जबाबदारीच्या पदांवर काम केले आहे.

## जाधव शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी

डॉ. जाधव यांनी १९९० मध्ये शिवाजी विद्यापीठातूनच इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीची पदवी (बी.ई.) घेतली. त्यानंतर वालचंद महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्समध्ये पदव्युत्तर पदवी (एम.ई.) घेतली. त्यानंतर राजस्थानच्या सिंघानिया विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. केली. त्यांनी डॉ. डी.वाय. पाटील शिक्षण समूहात १९९३ पासून अधिव्याख्याता पदापासून कारकिर्दीस सुरुवात करुन विविध पदांवर काम केले आहे.

कारकिर्दीत परीक्षा विभागात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिकाधिक विद्यार्थीभिमुख सुधारणा करण्यावर माझा भर राहील. सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्यास प्राधान्य राहील.

- डॉ. अजितसिंह जाधव, नूतन परीक्षा संचालक



लोकमत

05 JUN 2022

# विद्यापीठात शुक्रवारपासून प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : आगामी शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशकर्त्यांसाठी शिवाजी विद्यापीठाची १० जून ते १३ जून या कालावधीत प्रवेश परीक्षा होणार आहे. परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्धीस देण्यात आले आहे. प्रत्येक पेपरसाठी दीड तासाचा अवधी निश्चित केला आहे. पदव्युत्तर पदवीच्या या सर्व परीक्षा असणार आहेत. यात एमएससी, मास कम्युनिकेशन, एमए, एमसीए, एमबीए, बी.लिब, एमएसडब्लयू, जर्नालिझम, एम.ए रशियन, नॅनो सायन्स, फूड टेक्नॉलॉजी यांसह सर्व मास्टर सायन्ससाठी यातून प्रवेश निश्चित होणार आहेत.

0 5 JUN 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी डॉ. अजितसिंह जाधव

कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी प्रा. डॉ. अजितसिंह नारायणराव जाधव यांची निवड करण्यात आली. विद्यापीठ प्रशासनाने शनिवारी ही घोषणा केली.

डॉ. जाधव हे सध्या डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर येथे परीक्षा नियंत्रक आहेत. डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहात त्यांनी १९९३ मध्ये अधिव्याख्याता पदापासून कारकिर्दीस सुरुवात केली. त्यानंतर सहायक प्राध्यापक, अधिविभाग प्रमुख, डी. वाय. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य व प्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, अधिष्ठाता (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष), अधिष्ठाता (अभियांत्रिकी विद्याशाखा), अध्यक्ष, अभ्यास मंडळ (इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी) आदी विविध जबाबदारीच्या पदांवर कार्य केले आहे.

११ मे १९६८ रोजी जन्मलेल्या डॉ. जाधव यांचे मूळगाव मेडशिंगी (ता. सांगोला, जि. सोलापूर) आहे. त्यांनी १९९० मध्ये शिवाजी विद्यापीठातूनच इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीची पदवी (बी. ई.) घेतली. यानंतर वालचंद महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्समध्ये पदव्युत्तर पदवी (एम. ई.) घेतली. त्यानंतर राजस्थानच्या सिंघानिया विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली.

### विद्यार्थीभिमुख सुधारणा करण्यावर भर

या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह निवड समितीच्या सर्वच सदस्यांचा आभारी आहे. कारकीर्दीत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिकाधिक विद्यार्थीभिमुख सुधारणा करण्यावर माझा भर राहील, असे डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठातून...

# कुलसचिव पदासाठी १७ उमेदवारांच्या मुलाखती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी शनिवारी दिवसभर पात्र उमेदवारांच्या कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मुलाखती घेतल्या.

२७ पात्र उमेदवारांपैकी १७ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहिले. तथापि, कुलसचिव पदासाठी कोणत्याही उमेदवाराची निवड करण्यात आली नसल्याची माहिती विद्यापीठाने दिली आहे.

05 JUN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा-मूल्यमापन मंडळ संचालकपदी डॉ. अजितसिंह जाधव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी डॉ. अजितसिंह नारायणराव जाधव यांची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून शनिवारी ही घोषणा करण्यात आली.

डॉ. जाधव हे सध्या डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर येथे परीक्षा नियंत्रक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहामध्ये त्यांनी सन १९९३ मध्ये अधिव्याख्याता पदापासून आपल्या कारकिर्दीस सुरुवात केली. त्यानंतर सहायक प्राध्यापक, अधिविभागप्रमुख, डी. वाय. अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूरचे उपप्राचार्य व प्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, अधिष्ठाता (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष), अधिष्ठाता (अभियांत्रिकी विद्याशाखा), अध्यक्ष, अभ्यास मंडळ (इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी) आदी विविध जबाबदारीच्या पदांवर कार्य केले आहे.

दि. ११ मे १९६८ रोजी जन्मलेल्या डॉ. जाधव यांचे मूळ गाव मेडशिंगी (ता. सांगोला, जि. सोलापूर) आहे. त्यांनी १९९० मध्ये शिवाजी विद्यापीठातूनच इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीची पदवी (बी.ई.) घेतली. त्यानंतर वॉलचंद महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्समध्ये पदव्युत्तर पदवी (एम.ई.) घेतली. त्यानंतर राजस्थानच्या सिंघानिया विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली.

## परीक्षा विभागात विद्यार्थीभिमुख सुधारणांवर भर

हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी निवड होणे ही अतिशय भाग्याची गोष्ट आहे. या विद्यापीठाचा माजी विद्यार्थी असल्याने या निवडीला एक वेगळे महत्त्व आहे. या निवडीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह निवड समितीच्या सर्वच सदस्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. या कारकिर्दीत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिकाधिक विद्यार्थीभिमुख सुधारणा करण्यावर भर राहील, त्यासाठी सर्व सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन काम करण्यात येईल, अशी ग्वाही डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

## कुलसचिव पदासाठी १७ उमेदवारांच्या मुलाखती

दरम्यान, शनिवारी दिवसभर कुलसचिव पदासाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती झाल्या. एकूण २७ पात्र उमेदवारांपैकी १७ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहिले. तथापि, कुलसचिव पदासाठी कोणत्याही उमेदवाराची निवड करण्यात आली नाही.

सकाळ



# शिवाजी विद्यापीठात उद्या शिवस्वराज्य दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभाग, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे सोमवारी (ता. ६) शिवस्वराज्य दिन साजरा होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम होतील. सकाळी साडेदहाला प्रतिमापूजन, त्यानंतर गडकिल्ल्यांचे चित्र प्रदर्शन, किल्ले जंजी माहितीपट, 'गनिमी कावा' चित्रपट दाखवला जाईल. सायंकाळी चारला डॉ. शिवाजी जाधव यांचे 'पन्हाळगडचा इतिहास' या विषयावर व्याख्यान होईल.

05 JUN 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा संचालकपदी डॉ. जाधव

## मुलाखतीतून निवड; शिवाजी विद्यापीठ प्रशासनाची घोषणा

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक पदी येथील प्रा. डॉ. अजितसिंह नारायणराव जाधव यांची निवड जाहीर केली. विद्यापीठ प्रशासनाने आज ही घोषणा केली. डॉ. जाधव सध्या डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर येथे परीक्षा नियंत्रक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहामध्ये त्यांनी १९९३ मध्ये अधिव्याख्याता पदापासून आपल्या कारकिर्दीस सुरुवात केली. त्यानंतर सहायक प्राध्यापक, अधिविभागप्रमुख, डी. वाय. अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूरचे उप-प्राचार्य व प्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, अधिष्ठाता (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष), अधिष्ठाता (अभियांत्रिकी विद्याशाखा), अध्यक्ष, अभ्यास मंडळ (इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी) आदी विविध जबाबदारीच्या पदांवर कार्य केले आहे.



**डॉ. अजितसिंह जाधव**

डॉ. जाधव यांचा जन्म ११ मे १९६८ ला झाला. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामधले मेडशिंग त्यांचे मूळ गाव आहे. त्यांनी १९९० मध्ये शिवाजी विद्यापीठातूनच इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीची पदवी (बी.ई.) घेतली. त्यानंतर वॉलचंद महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्समध्ये पदव्युत्तर पदवी (एम.ई.) घेतली. त्यानंतर राजस्थानच्या सिंघानिया विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे.



### विद्यार्थीभिमुख सुधारणांवर भर

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा संचालकपदी निवड झाल्याचे समजल्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. अजितसिंह जाधव म्हणाले, "हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी निवड होणे ही माझ्यासाठी अतिशय भाग्याची गोष्ट आहे. या विद्यापीठाचा माजी विद्यार्थी असल्याने या निवडीला एक वेगळे महत्त्व आहे. या निवडीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह निवड समितीच्या सर्वच सदस्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. या कारकिर्दीत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिकाधिक विद्यार्थीभिमुख सुधारणा करण्यावर माझा भर राहील."

### कुलसचिव पदासाठी १७ मुलाखती

आज दिवसभर कुलसचिव पदासाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती झाल्या. एकूण २७ पात्र उमेदवारांपैकी १७ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहिले. तथापि, कुलसचिव पदासाठी कोणत्याही उमेदवाराची निवड करण्यात आली नाही, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

0 5 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या परीक्षा संचालकपदी डॉ. अजितसिंह जाधव

## शिक्षण क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव : येत्या काही दिवसात स्वीकारणार पदभार

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी डॉ. अजितसिंह जाधव यांची निवड झाली. ते डॉ. डी. वाय पाटील अभिमत विद्यापीठात परीक्षा संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामाची दखल घेत त्यांची परीक्षा संचालक म्हणून निवड केली. येत्या काही दिवसात शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून त्यांच्याकडे हा पदभार सोपवला जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांचा कालावधी संपल्यापासून या पदावर गेल्या तीन वर्षापासून गजानन पळसे प्रभारी म्हणून कार्यरत होते. सहा महिन्यापासून विद्यापीठाकडून या पदासाठी निवड प्रक्रिया सुरू आहे. ३ जून रोजी पात्र १९ उमेदवारांपैकी १३ उमेदवारांनी ही मुलाखत दिली. त्यातून निवड समितीने परीक्षा संचालक म्हणून



डॉ. अजितसिंह जाधव यांची निवड केली. डॉ. जाधव यांनी यापूर्वी २००० ते २०१७ पर्यंत इलेक्ट्रॉनिक विभागप्रमुख म्हणून काम केले. तसेच अभियांत्रिकी विद्याशाखा अधिष्ठाता व इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग अभ्यास मंडळ अध्यक्ष म्हणून २००५ ते २०१० पर्यंत काम पाहिले. २०१६ ते २०१८ या कालावधीत डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून तीन वर्षे कार्यरत होते. त्यांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन पेपर प्रसिद्ध झालेत. त्यांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामाची दखल घेत ही निवड केली. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### परिचय...

डॉ. जाधव यांचे मूळ गाव मेडसिंगी (ता. सांगोला, जि. सोलापूर) आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण आटपाडी येथे तर माध्यमिक शिक्षण सांगोला येथे झाले. अभियांत्रिकीचे संपूर्ण शिक्षण शिवाजी विद्यापीठात झाले असून ते डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. गेल्या ३० वर्षापासून डी. वाय. पाटील विद्यापीठात प्राध्यापक म्हणून ते कार्यरत आहेत.

### ऑफलाईन, ऑनलाईन परीक्षेला महत्त्व देणार

कोरोना कालावधीतील दोन वर्षे सोडली तर शिवाजी विद्यापीठात ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेतल्या जातात. नवीन शैक्षणिक धोरणात ऑनलाईन शिक्षण, परीक्षेला महत्त्व आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील परीक्षा पद्धतीत बदल करुन ऑफलाईन आणि ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याचा माझा मानस आहे. तसेच परीक्षा विभागात असलेल्या त्रूटींची दूर करुन विद्यार्थी हिताला महत्त्व दिले जाईल.

### कुलसचिव पदासाठी १७ उमेदवारांनी दिल्या मुलाखती

शनिवारी कुलसचिव पदाच्या मुलाखती पार पडल्या. या मुलाखतीसाठी २७ पैकी १७ उमेदवारांनी मुलाखत दिली. यामध्ये हेमंत जाधव, मोहन अबदार, राजकुमार पल्हाडे, धनंजय ठोंबरे, नितीन झावरे, भारत पाटील, प्रभाकर रामटेके, विलास शिंदे, महेश काकडे, प्रकाश पाटील, मधुकर भानारकर, अजितसिंह जाधव, लालासाहेब जाधव, विजय खोत, बाजीराव पाटील, डॉ. विलास सोयम, डॉ. विलास नांदवडेकर यांचा समावेश आहे. येत्या दोन दिवसात कुलसचिवपदाची निवड जाहीर केली जाणार आहे.

0 5 JUN 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तीन दशकात पर्यावरणशास्त्र विभाग जागतिक पातळीवर

## पर्यावरणशास्त्र विभागाची यशस्वी वाटचाल : संशोधन पेटंटच्या प्रक्रियेत




पर्यावरण दिन विशेष

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामध्ये १९८६ मध्ये स्थापन झालेल्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने ३६ वर्षात यशस्वी वाटचाल केली आहे. पहिले विभागप्रमुख डॉ. जय सामंत यांनी लावलेल्या रोपट्याचा विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी विस्तार केला. आता डॉ. आसावरी जाधव यांनी यावर यशाचा कळस चढवला आहे. पाणी, माती, हवा प्रदूषण यावर संशोधन करून जागतिक पातळीवर विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षराने कोरले आहे. परदेशी विद्यार्थ्यांचा येथे ओढा वाढत आहे. अफगाणिस्तानच्या विद्यार्थ्याने डॉक्टरेट पूर्ण केली आहे. या यशस्वी प्रवासाची नोंद जागतिक पातळीवर झाली आहे.

विद्यापीठात प्राणीशास्त्र विभागांतर्गत 'स्कूल ऑफ एनव्हायरमेंटल सायन्स' विभाग सुरू केला. १९८९ मध्ये १० विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात सध्या ३० पटसंख्या आहे. २२ वर्षापासून पर्यावरणशास्त्र विभागाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली. २००७ पासून अभियांत्रिकी शाखेत पर्यावरण विज्ञान व तंत्रज्ञान हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु केला. माजी विभागप्रमुख डॉ. राऊत यांनी अनेक नवीन संशोधन प्रकल्प, अभ्यासक्रम येथे सुरु केले. औद्योगिक आरोग्य, सुरक्षितता, पर्यावरणासंदर्भात पदविका अभ्यासक्रम सुरू केल्याने औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. पदवीप्राप्त विद्यार्थी अनेक औद्योगिक संस्थांसह प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत.

'साखर कारखान्यांतील चांगल्या प्रतिचे खत, कमी खर्चात फिल्टरविना पाणी शुध्दीकरण, प्लास्टिक विघटन, शहरातील हवा प्रदूषणाचे स्त्रोत, पानांपासून खत संशोधन सुरू आहे. अफगाणी विद्यार्थ्याने करवीर तालुक्यातील ३६० माती नमुन्यांचा अभ्यास करून त्यामध्ये कार्बनची पातळी किती आहे, यावर संशोधन केले आहे. बागांमुळे किती कार्बन शोषला जातो, यासंदर्भात संशोधन सुरू आहे.

**प्रदुषण रोखण्यासाठी जगजागृती**

पंचगंगा परिक्रमा, गणपती दान उपक्रमात सहभाग असतो. घनकचऱ्यापासून गांडूळखत निर्मिती व वृक्षारोपणावर भर दिला जातो.



### केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला अहवाल

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या राष्ट्रीय हवा प्रदूषण तपासणी प्रकल्पांतर्गत कोल्हापुरात ३ ठिकाणी हवा तपासणीचे काम सुरु आहे. याचा अहवाल केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाला आठवड्याला पाठवला जातो. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाजवळील प्रदूषणाची स्थिती, किरणोत्सर्गाची पातळी, वन्यजीवांची स्थिती, राधानगरी अभयारण्यातील प्राणी अधिवासाची ठिकाणे, करवीर तालुक्यातील भूजलाची वैद्यकीय अंगाने तपासणी असे प्रकल्प विभागाने पूर्ण केले आहेत.

### शालेय जीवनापासून पर्यावरण जनजागृतीची गरज

पर्यावरणशास्त्र विभाग पर्यावरणासंदर्भात जागरूकता निर्माण करतो. विभागातील शेकडो विद्यार्थी सेवेत रूजू आहेत. शालेय जीवनापासून पर्यावरणाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली तर प्रदुषण नियंत्रणासाठी त्याचा फायदा होईल.

**डॉ. आसावरी जाधव**
(पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ)

### पर्यावरण वाटचालीत विद्यापीठाचा सिंहाचा वाटा

पर्यावरणशास्त्र विभागाने कमी वेळेत जागतिक पातळीपर्यंत झेप घेतली आहे. लोकसंख्येच्या तुलनेत वाढते प्रदुषण रोखण्यासाठी विभागाने विविध प्रकल्प राबवले. कोल्हापूरच्या पर्यावरण वाटचालीत पर्यावरणशास्त्र विभागाचा सिंहाचा वाटा आहे.

**डॉ. पी. डी. राऊत** (माजी विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र)